आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.००वाजता
५ मार्च २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभेतून समाजवादी पार्टीचे अबु असीम आझमी निलंबित, तर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात महाविकास आघाडीचा अविश्वास प्रस्ताव

- सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांच मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना ठोठावलेल्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाची स्थगिती

- रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७४० अंकांची वाढ नोंदवत, पुन्हा ७३ हजाराच्या पातळीवर बंद

**<><><><><><>**

समाजवादी पार्टीचे आमदार अबु असीम आझमी यांना चालू अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. औरंगजेबाचं उदात्तीकरण केल्याबद्दल आझमी यांना निलंबित करावं असा प्रस्ताव संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. यावर भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हरकत घेत आझमी यांचं सदस्यत्व विधानसभेच्या पूर्ण कालावधीसाठी रद्द करण्याची मागणी केली. मात्र हे नियमात बसत नसून यासाठी आमदारांची समिती स्थापन केली जाईल असं आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी दिलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार

यांनी मुनगंटीवार यांच्या मागणीला पाठिंबा दिला, तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर अशीच कारवाई करणार का असा प्रश्न सरकारला विचारला. आझमी यांच्या वक्तव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान झाला असल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या. यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष सुरू केला..

अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाला.

कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी पक्षांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारे प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर, अबु आझमी यांच्याविरूद्ध आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली.

विधान परिषदेतही अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्याच्या मुद्द्यावरुन गदारोळ झाला. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आझमी, प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली. त्यानंतर दोन्ही बाजूचे सदस्य सभापती यांच्या समोरच्या जागेत घोषणाबाजी करू लागले. त्यामुळे सभापतींनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केलं.

**<><><><><><>**

विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात महाविकास आघाडीनं आज अविश्वास प्रस्ताव सादर केला. सभापती राम शिंदे यांच्याकडे हा प्रस्ताव देण्यात आला. शिवसेना पक्ष फुटीपूर्वी त्या उपसभापती झाल्या होत्या. त्यानंतर काही काळ त्या उद्धव ठाकरे यांच्यासोबत होत्या. नंतर त्या एकनाथ शिंदे

यांच्याकडे गेल्या. उपसभापतीपदी नियुक्ती झाली त्या सर्व आमदारांचा त्यांना पाठिंबा नसल्याचा दावा महाविकास आघाडीनं केला आहे.

**<><><><><>**

राज्यात ओबीसी समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी घोषित करण्यात आलेल्या ७२ पैकी ५४ वसतिगृह वर्षभरातच कार्यान्वित झाली असून उर्वरित वसतिगृह लवकरच सुरू होतील, अशी माहिती इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज विधानपरिषदेत दिली. **जालना** जिल्ह्यात कैलास बोऱ्हाडे या युवकाला मारहाण करणाऱ्यांवर मकोका लावण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत दिलं. याप्रकरणी जालन्याच्या पोलीस अधीक्षकांशी चर्चा करून सर्व गुन्हेगारांना अटक करण्याचे निर्देश दिले आहेत. लवकरच पालकमंत्री तिथे भेट देतील, असं शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी महाराज यांना अटक झाली त्या संगमेश्वर इथल्या सरदेसाई वाड्यात त्यांचे स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधान परिषदेत केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी विचारलेल्या उपप्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडला असलेल्या राजमाता जिजाऊंचा राजवाडा अधिग्रहीत करून त्या ठिकाणी शिवसृष्टी प्राधान्याने उभी केली जाईल, असं देखील मुख्यमंत्र्यांनी भाजपाच्या निरंजन डावखरे यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा झाली. परभणी जिल्ह्यातला आंबेडकरी कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी याचा कोठडीत मृत्यू झाल्याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, अशी टीका राष्ट्रवादी

काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी यावेळी केली. तसंच जालना जिल्ह्यातील भोकरदन इथं बोऱ्हाडे नावाच्या युवकाला गरम सळईनं चटके दिल्याचं प्रकरण महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे असं ते म्हणाले. या घटना थांबवायची गरज त्यांनी व्यक्त केली. यावर बोऱ्हाडे याला झालेल्या मारहाण प्रकरणी मकोका अंतर्गत कारवाई करावी असे निर्देश पोलीस अधीक्षकांना दिल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. जखमी तरुणाच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असल्याचं ते म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल चर्चेवर बोलताना सरकारवर जोरदार टीका केली. माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं शिक्षा सुनावल्यानंतरही त्यांचं सदस्यत्व रद्द होत नाही हा सरकारचा दुटप्पीपणा आहे, अशी टीका त्यांनी केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकारनं करावी अशी मागणी भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली. राज्यातल्या अनेक अंगणवाड्यांमधे वीज आणि शौचालय नाही, त्यामुळे अंगणवाडी दत्तक घेऊन तिथं सुविधा द्याव्यात असे मुनगंटीवार म्हणाले.

राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनांबद्दल राज्यपालांच्या अभिभाषणात काहीही उल्लेख नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले. लाडकी बहिण योजनेतून दहा ते वीस लाख महिलांना अपात्र ठरवलं जात आहे, त्यामुळे ही योजना निवडणुकीसाठी होती असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><><>**

सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारं ५०० रुपयांचं मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर

बावनकुळे यांनी ही माहिती दिली. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीनं करण्याचे निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

या निर्णयाचा फायदा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांबरोबरच कोट्यवधी नागरिकांनाही होणार आहे.

<><><><><>

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू शिवाजी कोकाटे यांना ठोठावलेल्या दोन वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयानं आज स्थगिती दिली. यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार दूर झाली आहे.

<><><><><>

रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगारविषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारला ते संबोधित करत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात या संकल्पनेचा प्रभाव दिसत आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प भारताच्या भविष्याची ब्लूप्रिंट आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि उद्योगांप्रमाणेच रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषालाही प्राधान्य दिलं आहे, असं मोदी म्हणाले.

<><><><><>

मेक्सिको आणि कॅनडावर लादलेले शुल्क कमी करण्याचे संकेत अमेरिकेनं दिल्यानं देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार उसळी घेतली. सेन्सेक्स ७४० अंकांची तेजी नोंदवून ७३ हजार ७३० अंकांवर बंद झाला. निफ्टी २५५ अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ३३७ अंकांवर स्थिरावला.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या जवळपासच्या ३२ गावांमधल्या महिला एकत्र येवून

महिला यशस्वीनी ॲग्रो प्रोडयुसर कंपनी २०१५ पासून चालवत आहेत. या कंपनीच्या अध्यक्ष तथा मुख्यप्रवर्तक अनिता मळगे यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट - अनिता मळगे.**

<><><><><><>

गडचिरोली पोलिस आणि CRPF नं आज दोन नक्षलवाद्यांना अटक केली. केलू पांडू मडकाम आणि रमा दोहे कोरचा अशी त्यांची नावं आहेत. त्यांच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

//<><><><><><>//